**नियमित दिवाणी दावा क्र. ५७/२०२०**

CNR No. MHSO060005692020

शामल रणदिवे

वि.

राजाराम भोसले वगैरे

**आदेश निशाणी क्र. ६२ वर**

०१. सोबतच्या यादीप्रमाणे महत्वाची कागदपत्र दाखल करण्यास प्रतिवादी क्र. २ यांनी परवानगी मागितलेली आहे. त्यावर वादी यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. सदर कागदपत्रे ही खुप उशिरा दाखल केलेली आहेत. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे त्यांनी नमूद केले.

०२. हा दावा निशाणी क्र. ५, निशाणी क्र. ४३ आणि निशाणी क्र. ५३ च्या सुनावणीसाठी नेमलेला आहे. त्याचे चौकशीसाठी प्रतिवादी क्र. २ हे साक्षीदार यांचे प्रतिज्ञापत्र तसेच खरेदीखत व फेरफार क्रमांकाची प्रत दाखल करत आहेत. जर सदर कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी दिली तर विरुध्द पक्षकार यांचेवर कोणताही अन्याय होणार नाही. त्याबाबत काही आक्षेप असल्यास युक्तीवादाचेवेळी तो सांगता येऊ शकतो. त्यामुळे केवळ उशिरा कागदपत्रे दाखल केल्यामुळे अर्ज नामंजूर करणे न्यायाचे दृष्टीने योग्य होणार नाही. या प्रकरणातील वादविषयाचा गुणदोषावर अंतिम व योग्य निर्णय होण्यासाठी नमूद कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी देणे न्यायाचे दृष्टीने योग्य राहील. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सोबतच्या यादीप्रमाणे कागदपत्र दाखल करण्यास नमूद प्रतिवादी क्र. २ यांना परवानगी देण्यात येत आहे.

SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR

Digitally signed by SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Date: 2022.03.08 13:11:05 +0530

दि. ०७/०३/२०२२

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

## **CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 07/03/2022 |
| Order uploaded on | : | 08/03/2022 |